जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 2 AUG 2026
पुण्यनगरी

# वाचन संस्कृती वाढवणे आवश्यक : आवटे

**कोल्हापूर :** आज आपण आधुनिकीकरणाच्या काळात वावरत असलो तरी, साहित्य हेच विवेक जागृत ठेवण्याचे काम करेल. वाचन संस्कृतीला वृद्धिंगत करत राहणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन साहित्यिक जयवंत आवटे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात विद्यार्थी स्वागत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षीय मनोगतात अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, ग्रंथ आयुष्याला कलाटणी देतात, त्यामुळे विचारांना स्पष्टता येते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी चौफेर दृष्टी ठेवून ज्ञानार्जक होणे आवश्यक आहे. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे यांनी शुभेच्छा दिल्या. एम. ए. भाग-१ मधील सुधीर पोटे, स्नेहल माने, निरंजन घुले या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. अनिता मिस्कुळ यांनी सूत्रसंचालन केले. मृण्मयी पांचाल यांनी आभार मानले. यावेळी प्रा. चंद्रकांत पोतदार, डॉ. सुखदेव एकल, रवी लोंढे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2026
जनप्रवास

# वाचन संस्कृती वृद्धिंगत करीत राहणे आवश्यक : आवटे

**कोल्हापूर :** वाचन संस्कृतीला वृद्धिंगत करीत राहणे ही काळाची गरज आहे, असे मत साहित्यिक जयवंत आवटे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात विद्यार्थी स्वागत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे अध्यक्षस्थानी होते.

आवटे म्हणाले, आपण आधुनिकीकरणाच्या काळात वावरत असलो तरी, साहित्य हेच आपला विवेक जागृत ठेवण्याचे काम करील. त्यासाठी सातत्याने वाचन करून जीवन समृद्ध करता येते. वर्गात उपस्थित राहून शिकणे ही चेतना जागृत असल्याचे लक्षण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ग्रंथांकडे वळून आपली उन्नती साधावी. यावेळी त्यांनी जीवनातील दाखले दिले. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, ग्रंथ आयुष्याला कलाटणी देतात. त्यासाठी विद्यार्थ्यांनी चौफेर दृष्टी ठेवून ज्ञानार्जक होणे आवश्यक आहे. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे यांनी शुभेच्छा दिल्या. एम. ए. भाग-१ मधील सुधीर पोटे, स्नेहल माने, निरंजन घुले या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. अनिता मिस्कुळ यांनी सूत्रसंचालन केले. मृण्मयी पांचाल यांनी आभार मानले. यावेळी प्रा. चंद्रकांत पोतदार, डॉ. सुखदेव एकल, रवि लोंढे, विद्यार्थी-विद्यार्थिनी, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2026
जनप्रवास



# संशोधक विद्यार्थी सागर इंगोले यांना पीएच.डी.

**जनप्रवास : कोल्हापूर**

विवेकानंद महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचे संशोधक विद्यार्थी सागर इंगोले यांना शिवाजी विद्यापीठाची भौतिकशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्राप्त झाली आहे.

फॅब्रिकेशन ऑफ ट्रान्सपरंट सिलिका बेस्ड सेल्फ-क्लीनिंग सुपरहायड्रोफोबिक कोटिंग्स फॉर सोलर सेल कव्हर ग्लास एप्लिकेशन या विषयावर शोधनिबंध सादर केला आहे.

या विषयासाठी त्यांना विवेकानंद महाविद्यालयाचे डॉ. संजय लट्ठे यांचे मार्गदर्शन लाभले. सागर इंगोले यांनी सोलर पॅनेलच्या पृष्ठभागावर सुपरहायड्रोफोबिक गुणधर्म असलेली सिलिका नॅनोपार्टिकलचा वापर करून विशेष कोटिंग्ज विकसित केले.

या कोटिंग्जमुळे पृष्ठभागावरील धूळ, घाण व सेंद्रिय प्रदूषके पाण्याच्या साहाय्याने आपोआप दूर होण्यास मदत होते. सागर इंगोले, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. श्रुती जोशी, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सीईओ कौस्तुभ गावडे, सचिन धनवडे यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 2 AUG 2026

जनप्रवास

# भारत- चीन संबंधांवर आज राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग व एक्स सर्व्हिसेस लीग यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या बुधवारी, १२ रोजी दुपारी ३ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात 'भारताचे सुरक्षा धोरण आणि भारत - चीन संबंध' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. बीजभाषक म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर मांडणी करणार असून अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत आहेत. नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात व लष्करी सेवेतील आजी माजी अधिकारी, मान्यवर व्यक्ती व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार आणि सी. जे. रानडे यांनी सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2026
पुण्यनगरी

# भारत-चीन संबंधांवर आज चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग व एक्स सर्व्हिसेस लीग यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारताचे सुरक्षा धोरण आणि भारत-चीन संबंध' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता हे चर्चासत्र होणार आहे. यामध्ये बीजभाषक म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर मांडणी करणार असून, अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत असणार आहेत. नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांची प्रमुख उपस्थिती असेल. ही माहिती राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, कर्नल सी. जे. रानडे (सेवानिवृत्त) यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 2 AUG 2026
लोकमत

# विद्यापीठाच्या ३१ विषयांची कॅरी ऑन परीक्षा सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ३१ विविध अभ्यासक्रमांची कॅरी ऑन परीक्षा तीन जिल्ह्यांतील २१ परीक्षा केंद्रांवर ११ ऑगस्ट २०२६ पासून सुरू झाली आहे. या परीक्षा १६ सप्टेंबर २०२६ पर्यंत चालणार आहेत. संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांची शनिवारी सकाळी ११:४५ ते दुपारी १ वाजेपर्यंत ऑनलाइन बैठक घेण्यात आली. या बैठकीत परीक्षेसंदर्भातील विविध महत्त्वपूर्ण बाबींवर चर्चा करण्यात आली. अभियांत्रिकी व फार्मसी शाखेच्या पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षेचे आयोजन १७ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. याशिवाय, बी.टेक.पुनर्परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया १२ ते १४ ऑगस्ट या कालावधीत होणार असून, पुनर्परीक्षा १९ ऑगस्टपासून घेण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2026

पुढारी

# 'दूरशिक्षण' अभ्यासक्रमांच्या प्रवेशास १० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेशास १० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक प्रा. डॉ. पी. एस. पाटणकर यांनी दिली.

दूरशिक्षणांतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित), तर ऑनलाईन पद्धतीने एम.बी.ए., एम.कॉम. व एम.एस्सी. (गणित) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत.

नियमित शिक्षण घेता न आलेले विद्यार्थी, नोकरी करणारे, गृहिणी, उद्योजक, शेतकरी, सैनिक, कामगार तसेच बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ही शिक्षणाची चांगली संधी आहे. विद्यापीठाच्या ८९ अभ्यासकेंद्रांमार्फत प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नियमित महाविद्यालय किंवा मुक्त विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही नियमानुसार दुहेरी पदवी घेण्याची संधी आहे. इच्छुकांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून किंवा ऑनलाईन प्रवेश पोर्टलद्वारे प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2026
जनप्रवास

# प्रति सरकारमधील महिलांबाबत उद्या विद्यापीठात चर्चसत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि क्रांतीअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १३ ऑगस्ट रोजी शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये 'प्रतिसरकारची चळवळ: रणरागिणी रणि ठाकल्या' या विषयावरील एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. या चर्चासत्रात ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर बीजभाषण करतील. उद्घाटन सत्रास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी असतील. तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, सरोज पाटील, अरुण लाड प्रमुख उपस्थित असतील.

चर्चासत्राचे पहिले सत्र 'प्रतिसरकार चळवळीतील कर्तृत्ववान स्त्रिया -१' या विषयावर असून यामध्ये डॉ. पद्मजा पाटील, डॉ. कल्पना गुरव, प्रा. प्रसाद कुलकर्णी सहभागी होतील. अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश पवार असतील. 'प्रतिसरकार चळवळीतील कर्तृत्ववान स्त्रिया -२' या दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. भारतभूषण माळी, डॉ. प्रकाश कुंभार, दमयंती पाटील हे सहभागी होतील. डॉ. दशरथ पारेकर अध्यक्षस्थानी असतील. तिसरे सत्र 'प्रतिसरकार चळवळीतील स्त्रियांचा सहभाग' असे असून या सत्रामध्ये संपत मोरे, डॉ. दिनकर पाटील, विष्णू पावले हे मांडणी करतील. सत्राचे अध्यक्ष प्रा. अवनीश पाटील असतील. समारोप सत्रात डॉ. भारती पाटील बोलतील. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे असतील. या चर्चासत्रात विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, अभ्यासक, मान्यवरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील आणि डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 AUG 2026
सकाळ

# ऑनलाईन अभ्यासक्रम प्रवेशास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील विविध पदवी, पदव्युत्तर आणि ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेशास १० सप्टेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती केंद्राचे संचालक प्रा. डॉ. पी. एस. पाटणकर यांनी दिली. संकेतस्थळावर प्रवेशाची सविस्तर माहिती घेऊन ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर प्रवेश निश्चित करावा. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नियमानुसार दुहेरी पदवी (Dual Degree) घेण्याची संधीही उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.